


REGISTERED No. B. 3434

# अर्थ

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख १ आक्टोबर १९४६ अंक ४१

तोच सुदिन
कीं
ज्या दिवशीं भारतावर
स्वातंत्र्यसूर्य चमकेल

पण हा सुदिन आपण स्वयंसिद्ध झाल्याविना कसा दिसेल!


याकरतां देशांतील सर्व उद्योगधंदे पूर्ण राष्ट्रीय करून परदेशांत जाणारा द्रव्यौघ थांबविणें, हें आपलें आद्य कर्तव्य ठरतें. तरी आयुष्याच्या विम्याचा धंदा करणारी

येथील सुप्रसिद्ध

कॉमनवेल्थ
विमा कंपनी लि.,

येथें आपला स्वतःचा विमा उतरून आपल्या कर्तव्यांतून मुक्त व्हा.

एजन्सीसाठीं आजच लिहा अगर भेटा
ल. ब. उर्फ अण्णासाहेब भोपटकर—अध्यक्ष
व एस. एम. जोशी—मॅनेजिंग डायरेक्टर



अधिक धान्य पिकविण्याची योजना
—यशस्वी होण्यास—
किर्लोस्कर पंपिंग सेटस
हें अमोघ साधन आहे.
त्याचें सहाय घ्या!

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

साठे बिस्किटें

युद्धोत्तरकाळीं आम्ही सर्व ग्राहकांची गरज भागवूं शकूं अशी अपेक्षा होती. पण प्रचलित अन्नपरिस्थितीमुळें वाहतुक व पुरवठा याबाबतचीं नियंत्रणें, तसेंच यंत्र-सामुग्रीची ठराविक उत्पादन-शक्ति, या कारणांमुळें अद्याप पुरवठा अपुरा आहे म्हणून तूर्त बिस्किटें कमी वापरणें जरूर आहे.

व्यापाऱ्यांनीं स्थानिक स्टॉकिस्टकडे चौकशी करावी.

कृष्णा शुगर मिल्स लिमिटेड
डिस्टिलरी लवकरच सुरू होणार
ठराविक मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात
कॅपिटल कंट्रोल ऑर्डर १४/अ अन्वयें दिलेल्या सवलतीनुसार आरंभीपैकीं उरलेले
दोन लक्षांचे ६ टक्के क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स शेअर्स विक्रीस काढले आहेत.

कृष्णा कित्तूर, जि. बेळगांव } विंचूरकर आणि कंपनी, मॅनेजिंग एजंटस.

अधिक माहिती—रा. डी. एच. बेडेकर
सरदार विंचुरकरांचा वाडा, सदाशिव पेठ, पुणें २ यांचेकडून मिळेल

## विविध माहिती

**हिंदुस्थान सरकार कर्ज मागणार**—इंटर नॅशनल बँकेकडे हिंदी हंगामी सरकार कर्ज मागणार आहे.

**ॲटलँटिक ओलांडण्यासाठी आगबोटींची ये-जा**—उतारूंच्या ऐषआरामी आगबोटींची अमेरिका-युरोप ये-जा मोठ्या प्रमाणावर लवकरच सुरू होणार आहे. यु. एस. एस. अमेरिका ही ७२३ फुटी आगबोट १७ ऑक्टोबर रोजीं न्यूयॉर्क सोडील आणि तिच्यामध्यें १,०५० उतारूंची सोय होईल.

**शेतीच्या व्यवसायांत विजेचा प्रसारः**—अमेरिकेंतील ५८,७६,७३० शेतांपैकी ५२·९% इतक्या शेतांवर विजेची यंत्रसामुग्री वापरण्यांत येते. ११ वर्षांपूर्वी फक्त १०·९% शेतांतच ती उपयोगांत आणली जात असे.

**रेडिओ सेट्सचें प्रचंड उत्पादनः**—अमेरिकन कारखानदारांनीं ऑगस्ट १९४६ मध्यें १५ लक्ष रेडिओ सेट्स तयार केले.

**कृत्रिम रेशमाच्या कारखान्याची योजना**—कारवारमधील चांबूपासून धागा व कृत्रिम रेशीम तयार करण्याची २ कोटि रुपयांची, बेळगांवचे डॉ. तेंडुलकर ह्यांची योजना आहे. त्या योजनेबाबत चौकशी करण्यासाठीं मुंबई सरकारनें सर अर्देशिर दलाल ह्यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमली आहे. मुंबई प्रांताचे डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज हे कमिटीचे सेक्रेटरी आहेत.

**वेस्टर्न इंडिया थिएटर्स लि.**—वरील खासगी लिमिटेड कंपनीचें २६ सप्टेंबर रोजीं पब्लिक लिमिटेड कंपनींत रूपांतर करण्यांत आलें. मोदी लि. हे मॅनेजिंग एजंटस आहेत.

**डॉ. डाल्टन**—जागतिक बँक आणि फंड ह्या दोन्ही संस्थांच्या नव्या अध्यक्षाचे जागीं ब्रिटिश फडणवीस डॉ. डाल्टन ह्यांची निवड झाली आहे.

**हिंद विजय पिक्चर पॅलेस**—विजय एंटरप्रायझर्स ( श्री. रतनचंद, पेपर मर्चंट श्री. मा. रा. जोशी व औंध म्यूच्युअलचे श्री. वि. गो. जोशी ) ह्यांच्या वरील सिनेमा थिएटरला परवानगी मिळाली आहे. हें थिएटर पुणें येथें जंगली महाराज रस्त्यावर, पुलाचे वाडीनील नदीवरील कॉजवेच्या रस्त्याशेजारी होणार आहे. विजया दशमीचे मुहूर्तावर विजय एंटरप्रायझर्सनीं भूमिपूजा केली.

### " अर्थ " चा दिवाळी अंक

दर वर्षीप्रमाणें, " अर्थ " चा दिवाळीचा मोठा अंक चालू वर्षींहि प्रसिद्ध होईल. ता. १६ ऑक्टोबरचा अंक दिवाळी अंक म्हणून निघेल आणि त्यानंतरचा अंक ता. ६ नोव्हेंबर रोजीं प्रसिद्ध होईल.


बडोदें सरकारच्या आश्रयानें संस्थापित

## दि बडोदा बॅटरीज् लिमिटेड.

गोया गेट, बडोदा

★ ऑर्डिनरी शेअर्स रु. २० चे प्रत्येकीं पेडअप रु. १०. क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स शेअर्स, ५½ टक्के व्याजाचे, प्रत्येकीं रु. ५० चे पेडअप रु. २५.

★ १,२,३ व ४ वर्षे मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येत आहेत.

★ सुप्रसिद्ध " तेज " बॅटरीज तयार करणारा राष्ट्रीय उद्योगधंदा.

मॅनेजिंग एजंटस :

**पानसे आणि कंपनी,**

गोया गेट बडोदा.

किंवा, सरदार पानसेवाडा, शुक्रवार पेठ, पुणें.

या पैकीं कोणत्याहि ठिकाणीं माहिती पत्रकें व अर्जाचे फॉर्म्स इत्यादि मिळतील.



# गव्हर्न्मेंट ऑफ इंडिया

## कर्जांत बदल

### करण्याची शेवटची तारीख

## पुढें ढकलली

खालीं नमूद केलेल्या कर्जांत बदल करण्याची सवलतीची मुदत आणखी वाढवून ती ३० सप्टेंबर, १९४६ ची १४ ऑक्टोबर, १९४६ करण्यांत आली आहे:—

१८४२-४३; १८५४-५५; १८६५; १८७९ आणि १९००-१ च्या

**३॥ टक्क्यांच्या परत फेडीच्या कर्जांची**

(१) ३ टक्क्यांचें १९४६ चें कर्ज

( दर्शनी १०० रु. किंमतीच्या कर्जरोख्यांचे बदली १०० रु. किंमतीचे कर्जरोखे )

**किंवा**

(२) २¾ टक्क्यांचें १९७६ चें कर्ज

( दर्शनी १०० रु. किंमतीच्या कर्जरोख्याबदली ९९ रु. किंमतीचे कर्जरोखे )

**ह्या कर्जांत बदल**

( हिंदुस्थान सरकारच्या फायनॅन्स खात्याचें प्रकाशन )

## न्यूरेंबर्ग खटल्याचा निकाल

जर्मनीचा पराभव झाल्यावर पकडण्यांत आलेल्या नाझी प्रमुखांवर खटला भरून शिक्षा देण्यासाठी गेल्या वर्षाच्या नोव्हेंबरमध्यें एक आंतर राष्ट्रीय कोर्ट स्थापन करण्यांत आलें. न्यूरेंबर्ग येथें चाललेल्या या खटल्याचें काम संपून आरोपींना कडक शिक्षा ठोठावण्यांत आल्या. गुन्हा नाशाबित म्हणून सोडलेल्या आरोपींत डॉ. शाक्ट, राइश बँकेचे गव्हर्नर; फॉन पेपेन आणि दुय्यम प्रचारमंत्री फ्रिटशू हे तिघे आहेत. यांपैकी शाक्ट व पेपेन यांना दोषमुक्त ठरविण्याबाबत रशिअन न्यायाधीशाचा मतभेद आहे. आधुनिक युद्धांत प्रत्यक्ष भाग घेणारे व युद्ध प्रयत्नांना पिछाडीला राहून मदत करणारे असा भेद राहिलेला नाहीं. त्याचप्रमाणें हुकुमशाही शासन–संस्थेंतही लष्करी, राजनैतिक व आर्थिक पुढारी असा भेद आक्रमक युद्धाच्या परिणामाच्या दृष्टीनें योग्य होणार नाहीं. जर्मनीची हुकुमशाही राजवट प्रस्थापित करण्यांत व पुढें तिला स्थैर्य आणण्यांत या दोघांची अतिशय मदत झालेली आहे. हें लक्षांत घेतां डॉ. शाक्ट व फॉन पेपेन यांना सोडण्याचा निर्णय चुकीचाच म्हटला पाहिजे. फॉन पेपेन यांनीं ऑस्ट्रियाच्या स्वातंत्र्यविनाशांत जो भाग घेतला, त्याबद्दल ऑस्ट्रिअन सरकारकडून पेपेन यांना आपल्या ताब्यांत देण्याची मागणी करण्यांत आली आहे ती योग्यच आहे. रुडॉल्फ हेस याला देण्यांत आलेली जन्मठेपेची शिक्षाही अयोग्य आहे. हिटलरच्या प्रभावळींतील एक प्रमुख म्हणून त्यालाही फासावर लटकविणेंच योग्य होईल. या खटल्याच्या कायदेशीरपणाबद्दल वाद घालण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण प्रो. हॅरोल्ड लास्की यांनीं म्हटल्याप्रमाणें कोणत्याही मानवी कायद्याचें बंधन न पाळणाऱ्या गुंडांचें राज्य म्हणजेच हिटलरचा जर्मनी अशी स्थिति आहे. गुंडांनीं एकाद्या देशाची शासन संस्था काबीज केली तर त्या शासन संस्थेचें स्वरूप मामुली न रहातां, तिला एकाद्या दरवडेखोरांच्या टोळीचें स्वरूप येतें. त्यामुळें झाला हा फैसला एकंदरीनें ठीक झाला असेंच म्हणावयास पाहिजे.

---

## विवाहित स्त्रिया व सरकारी नोकऱ्या

विशेषतः युद्धकाळांत, बऱ्याच हिंदी स्त्रिया सरकारी नोकरी करूं लागल्या व कित्येक स्त्रिया केवळ शाळा किंवा इस्पितळें ह्यांतच नव्हे तर बँका वगैरे व्यापारी पेढ्यांतहि आतां कामें करूं लागल्या आहेत. विवाहित स्त्रिया म्हटल्या म्हणजे मुलें–बाळें हीं आलींच व त्या कारणानें त्यांच्याकडून योग्य प्रकारें आणि वक्तशीर काम होऊं शकत नाहीं, अशी तक्रार ऐकूं येते. पुरुष नोकर मिळणें अवघड होतें तेव्हां स्त्रियांना त्यांच्या जागीं नेमून काम रेटतां आलें तरी मामुली काळांत स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीनें कामें करूं शकतील किंवा नाहीं, असा प्रश्न उभा रहातो. "सरकारी नोकरांस विवाहाचा प्रतिबंध", ह्या ग्रेट ब्रिटनमधील परिस्थितीवर आधारलेल्या रिपोर्टांत इतर देशांतील परिस्थितिहि वर्णिलेली आहे. तीवरून असें दिसतें, कीं अमेरिका, रशिया, स्वीडन, डेन्मार्क, फिनलंड इत्यादि देशांत विवाहित स्त्रियांना सरकारी नोकऱ्यांत युद्धकाळापूर्वीहि मज्जाव नव्हता. ग्रेट ब्रिटनमध्यें युद्धकाळांत नाइलाज झाला तेव्हांच ही बंदी उठली आणि युद्धसमाप्तीनंतर लंडन कौन्टी कौन्सिलखेरीज दुसऱ्या सर्व मोठ्या संस्थांनीं ही बंदी कायम राखलेली आहे. सरकारी नोकरांच्या असोसिएशन्सचीं मतें पहातां, बंदी उठविणारांचें मताधिक्य आढळत नाहीं. विवाहानंतरहि काम करूं इच्छिणाऱ्या स्त्रियांची संख्या फारशी नसते हें खरें असलें तरी आर्थिक परिस्थितीमुळें त्यांना तें करीत रहाणें भाग पडतें, अशी हिंदुस्थानांतील मध्यमवर्गाची तरी स्थिति झाली आहे. कार्यक्षमता हा एकच कस लावून नोकरास कामावर ठेवावें, हा ह्या अडचणींतून मार्ग सुचविण्यांत येत आहे.


पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.

१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २२७३८




शेअर्स विकणें आहेत:––

गोवर्धन डेअरी फार्म्स लि.

गोवर्धनवाडी, पुणें १.













पुणें चीफ एजंट:—

न्यू दत्त एजन्सी

१००, रविवार पेठ, मोती चौक, पुणें.









## रावसाहेब खोले ह्यांचे प्रकट आभार

मी पुणें सेंट्रल को. बँक लि. या संस्थेचा सन १९४३ ते १९४६ पर्यंत संचालक मंडळाचा प्रमुख म्हणून काम केले. या अवधींत सहकारी चळवळ, अन्नधान्य इत्यादि प्रश्नासंबंधीं अडचणी बँकेच्या संचालक मंडळाचे सदस्य, बँकेचे अधिकारी व नोकर वर्ग, त्याचप्रमाणें पुणें शहर व जिल्ह्यांतील अनेक कार्यकर्ते व माझे मित्र यांचे सहकार्यानें व मदतीनें सोडवूं शकलों. बँकेच्या भागीदारांनीं सतत गेलीं तीन वर्षे मला मोठ्या प्रमाणावर मदत करून निवडणुकींत निर्भेळ असें यश प्राप्त करून देण्यांत जें अमोल सहाय केलें त्याबाबत मी त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानतों. वरील कालावधींत मजकडून जनतेची व मुख्यतः जिल्ह्यांतील शेतकरी जनतेची जी अल्प सेवा झाली व त्याबद्दल त्यांनी मजवर जें अलोट प्रेम व विश्वास प्रकट केला त्यामुळें मला काम करण्यास अधिक उत्साह वाटत आहे. मी असें निश्चयपूर्वक सर्वांना आश्वासन देतों कीं याहि पुढें सहकारी चळवळीच्याद्वारें मला जें काय करतां येईल तें मी सतत करीनच. कळावें ही विनंति.

४४९, बुधवार, पुणें २
३०-९-४६ } य. द. खोले.

---

### श्री शिवाजी नॅशनल बँक लि., कोल्हापूर

वरील बँकेनें तिसऱ्या वर्षाचे अखेरीस ३०½ हजार रु. वसूल भांडवल, १ हजार रुपये रिझर्व्ह व इतर फंड, ४½ लक्ष रुपये ठेवी, २¾ लक्ष रुपये रोख व बँकांत, २½ लक्ष रुपयांचीं कर्जें, ४,२९५ रु. नफा, अशी प्रगति केली आहे. बँकेनें १९४५ सालीं मिरज येथें शाखा सुरू केली. बँकेनें " स्वराज्य बाँड " ह्या नांवाची गरिबापासून श्रीमंतापर्यंत १० रु. पासून ठेव ठेवतां येणारी पांच वर्षांची योजना सुरू केली आहे. भागीदारांस ६½% करमाफ डिव्हिडंड पहिल्या वर्षापासून देण्यांत आलें आहे. बँकेचे डायरेक्टर्स किंवा त्यांचे हितसंबंध असलेल्या फर्म्स ह्यांना बँकेनें स्थापनेपासूनच कांहींहि कर्ज दिलेलें नाहीं, हें तिचें एक वैशिष्ट्य सांगतां येईल. बँकेचे पहिले चेअरमन फिल्म प्रोड्यूसर श्री. बाबुराव पेंढारकर हे होते, आतां श्री. द. रा. पाटगांवकर- सराफ व जमिनदार, हे आहेत. श्री. दि. रा. शिंदे व श्री. ना. ह. साळोखे हे मॅ. डायरेक्टर्स आहेत.

### महाड को. अर्बन बँक लि., महाड

गेल्या वर्षअखेर बँकेचें वसूल भांडवल ३७,६२५ रु. होतें, तें आतां ४९,१२५ रु. झालें आहे. रिझर्व्ह व इतर फंड १४ हजारांवर गेला आहे. ठेवी ६ लाखांच्या आहेत. बँकेनें ५७ हजार रु. रोख, १ लक्ष ६ हजार रु. इतर बँकांत व ४ लक्ष ७४ हजार रु. सरकारी रोख्यांत आणि कायम ठेवींत ठेवून ४१ हजारांचीं कर्जें दिलीं आहेत. ह्यावरून तिच्या पैशाचा तरतेपणा स्पष्ट होईल. अहवालाचे वर्षांत कर्जांचा व्यवहार वाढला आहे, हें समाधानाचें आहे. बँकेस १४,५६१ रु. नफा झाला. भागीदारांस ७½% डिव्हिडंड देण्यास ३,००६ रु. लागले.

### श्रीलक्ष्मी सें. को. बँक लि., फलटण

वरील बँकेची सालोसाल प्रगति होत आहे. एका वर्षांत खेळतें भांडवल १० लाखांनीं वाढलें. सहकारी पेढ्यांस, वैयक्तिक भागीदारांस व ओव्हरड्राफ्ट मिळून ३ लक्ष, ८ हजारांचीं कर्जें दिलेलीं आहेत. गुंतविलेल्या रकमांत बँकांतील मुदती ठेवींचें प्रमाण मोठें दिसतें. अहवालाचे वर्षी १६,६८२ रु. नफा झाला व भागीदारांस ७% डिव्हिडंड मिळाले.

### अर्बन को. बँक लि., सांगली

वरील बँकेचें खेळतें भांडवल ११½ लक्ष रु. आहे, त्यांत बँकेचें स्वतःचें भांडवल १ लक्ष, २३ हजार रुपये आहे. बँकेनें ६ लक्ष, ८६ हजारांचीं कर्जें दिलेलीं आहेत. वर्षअखेर १३,३२८ रु. नफा होऊन भागीदारांस ६½% नफा मिळाला.

### इचलकरंजी सें. को. बँक लि.

बँकेचें स्वतःचें भांडवल गेल्या वर्षांत ८०,९६७ रुपयांचें ८८,५२९ रु. झालें. खेळतें भांडवल ७½ लाखांवरून ११½ लाखांवर गेलें. कर्जांची उलाढाल वाढूनहि, थकबाकीचें प्रमाण अत्यल्प आहे. आजरें शाखेचा व्यवहार समाधानकारक चालला आहे. गेल्या सोळा वर्षांत झाला नाहीं इतका नफा (१४,९०९ रु.) ह्या वर्षी झाला. भागीदारांस ७½% डिव्हिडंड मिळेल.


## दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, पुणें.

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन

श्री. वा. पु. वर्दे, श्री. न. ग. पवार, श्री. श्री. गो. मराठे,
श्री. र. चिं. सोहनी, श्री. मा. रा. जोशी, श्री. फ. दो. पदमजी,
श्री. म. वि. गोखले, श्री. मा. वि. शहा, श्री. शं. ल. किर्लोस्कर

—भाण्डवल—

अधिकृत रु. ५०,००,००० खपलेलें रु. २५,००,०००
जमा रु. १२,५०,००० रिझर्व्ह व इतर फंड रु. ३,००,०००
एकूण खेळतें भाण्डवल रु. १,७०,००,०००

—:शाखा:—

डेक्कन जिमखाना, खडकी, मुंबई (फोर्ट), गिरगांव, जळगांव, नागपूर, कोपरगांव, रत्नागिरी, सोलापूर, धुळें, चाळिसगांव व फैजपूर (पे-ऑफिस)

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एक्झिक्यूटर व ट्रस्टी कंपनीचे कामास सुरवात झाली आहे.

सी. व्ही. जोग
मॅनेजर



## दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

हेड ऑफिसः—पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, ओझर (जि. नाशिक), खोपोली—पे—ऑफिसः

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल ... | रु. ७,९३,८१० |
| वसूल झालेलें भांडवल ... | रु. ३,८९,६५५ |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ४५ लाखांचेवर |

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B. (वकील)

- गतवर्षी ऑर्डिनरी शेअर्सवर चार टक्के अधिक अर्धा टक्का करमाफ डिव्हिडंड दिलें.
- मुंबई, नगर, नाशिक, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे ठिकाणीं डिमांड ड्राफ्टस दिले जातातः—
- बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एन. एन. क्षीरसागर.
आर. बी. साळवेकर,
बी. ए. एलएल. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.

## मुंबई शेअर बाजार

(वि. म. लिमये आणि मं. यांजकडून)

* व्याजवजा
गोकाक रु. ६ दि. २६–१०–४६
नागपूर रु. ७ दि. ४–११–४६

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार १।१०।४६ | बुधवार २।१०।४६ | गुरुवार ३।१०।४६ | शुक्रवार ४।१०।४६ | सोमवार ७।१०।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६०५; ११८० | १२९–८–९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस | ३० | २९४०—० | —बाजार बंद— | २९७५—० | २९८०—० | |
| ४८०; ३७२ | २३–०–० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ५२७—८ | | ५३२—८ | ५३०—० | |
| २२२२-८; १७६३-१२ | २५–०–० † | मार्च–सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | ३०९२—८ | | ३११०—० | ३०९५—० | |
| ७०२; ५६६ | १२–०–० † | मार्च–सप्टें. | कोहिनूर | १०० | ९१९—० | | ९४०—० | ९४८—० | |
| ६६८; ५०७ | २२–०–० | मे | स्वदेशी | १०० | ७३२—० | | ७७१—० | ७६२—० | |
| ४४३–८; ३६० | ७–०–० S | नोव्हें.–एप्रिल | नागपूर | १०० | ४१०—० | | ४०९—० | ४१२—० | |
| ३४२–०; २७५ | १५–०–० | मार्च | फिनले | १०० | ४१७—० | | ४२२—० | ४२५—० | |
| ३३५; २८३-८ | ६–०–० † | ऑक्टो.–एप्रिल | गोकाक | १०० | ४०९—० | | ४१७—० | ४१२—० | |
| ३३७; २४३ | ९–०–० S | जाने.–जुलै | सिंप्लेक्स | ५० | ४३२—० | | ४४२—० | ४३४—० | |
| ५; ३-११-० | ०–४–० | मार्च | अपोलो | २ | ५–६—६ | | ५—८ | ५—८ | |
| १७-१०; १३-७-० | ०–१५–० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | २२–१४ | | २३–४ | २३–६ | |
| ३-१०; २-९ | ०–३–० | मे | „ डिफर्डस | १ | ४–१५ | | ५—१ | ५–०–० | |
| ७९०; ६४५ | ४१–०–० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ८५७—८ | | ८५२—८ | ८३७—८ | |
| २४३–८; २०६-८ | ७–०–० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २४४—८ | | २४४—० | २४४—० | |
| २५६; २१३-८ | ८–०–० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | ३३७—० | | ३३८—० | ३३८—० | |
| ५९२-८; ५१०-० | ७–८–० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ६९२—८ | | ६९०—० | ६८२—८ | |
| ४३-७; ३०-१२ | ०–४–० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ४९—४ | | ४९—२ | ४८—६ | |

### श्रीजगदंबा को. क्रे. सोसायटी, कोकळे

चालू सालीं धान्यास व इतर मालास चांगला भाव मिळाल्यानें बऱ्याच दिवसांचीं कर्जें कमी झालीं असून, सोसायटीकडील मागील थकबाकीहि बरीच वसूल झाली आहे. अहवालाचे वर्षी बऱ्याच सभासदांना लोकांचे किरकोळ देणें भागविणें व जमीन सुधराई ह्यासाठी कर्जें दिलीं गेलीं. सोसायटीचें शेअर भांडवल ३,२९३ रुपये असून रिझर्व्ह फंडांत १,७८६ रु. आहेत. थकबाकी फक्त ९९ रु. आहे. सोसायटी " अ " वर्गांत आहे. सोसायटीच्या मालकीचें सहकार मंदिर बांधणें व कंझूमर्स सोसायटी स्थापणें ह्या दोन योजनांचा सोसायटी विचार करीत आहे. सोसायटीचा कारभार चांगला चालल्याचें अहवालावरून दिसून येतें.


★ बँक ऑफ पूना लि. ★

अधिकृत भांडवल ... रु. ५०,००,०००
विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. २५,००,०००
वसूल झालेलें भांडवल ... रु. १२,५०,०००

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

शेट मुरलीधर चतुर्भुज लोया (चेअरमन); शेट डी. आर. नाईक, जे. पी. (व्हाइस चेअरमन); डॉ. ना. भि. परुळेकर, M.A., Ph.D., (संचालक 'सकाळ'); शेट लक्ष्मीनारायण रामचंद्र राठी; शेट फ्रामजी पी. पोचा; शेट नारायणदास श्रीराम सोमाणी.

हेड ऑफिस: ४५५ रविवार पेठ, पुणें.
शाखा—(१) ६६१ सदाशिव पेठ, पोस्टासमोर.
(२) ११ भवानी पेठ, पुणें.

सेफ डिपॉझिट लॉकरची अल्प भाड्यांत सोय.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. उद्योगधंद्यांना व व्यापारवाढीला सवलत. पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा कचेऱ्यांस लिहा.

G. G. SATHE, ॲक्टिंग मॅनेजर.

सोलापूर येथें बँकेची शाखा लवकरच उघडली जाईल


**यंत्रसामुग्री लवकर मिळूं शकणार नाहीं**—हिंदी कपास कापडाच्या गिरण्यांसाठी यंत्रसामुग्री मिळविण्याकरितां एक शिष्टमंडळ विलायतेस जात आहे, त्या संबंधांत यंत्रसामुग्री बनविणारा एक इंग्रज कारखानदार म्हणतो, " यंत्रांचे सुटे भाग आम्हीं एक वर्षाचे आंत देऊं शकतों. स्पिनिंगला लागणारीं यंत्रें दोन–तीन वर्षें मिळूं शकणार नाहींत आणि मागासाठी तीन–चार वर्षें वाट पहावी लागेल. स्वित्झर्लंड लवकर ऑर्डर पुरी करूं शकेल, परंतु त्याच्या किंमती जास्त आहेत. अमेरिकाहि लवकर डिलिव्हरी देण्यास तयार आहे, पण तेथील कारखानदार संबंद्ध ऑर्डर एकदम पुरी न करतां प्रत्येक गिऱ्हाइकास हप्त्याहप्त्यानें माल पुरवीत रहातात. "

**भाषा कोविदांस मागणी येणार**—इतर देशांच्या भाषा आणि संस्कृति ह्यांचें ज्ञान असलेल्या भाषाकोविदांची एक यादी काँग्रेस तयार करीत आहे. यादींतील पंडितांचा जरूरीप्रमाणें उपयोग करून घेतला जाईल. मध्यवर्ती सरकारांत हिंदी लोकांना संपूर्ण सत्ता मिळणार आहे तेव्हां परराष्ट्रीय खात्यासाठीं असे लोक मोठ्या प्रमाणावर लागतील.


# व्यापारी संवर्धनगृह, पुणें

अखिल भारतीय कलाकौशल्याचे व छोटेखानी धंद्यांतून निर्माण होणाऱ्या अनेकविध वस्तूंचें कायमचे प्रदर्शन.

संस्थेस भेट देऊन कलाकौशल्यास प्रोत्साहन द्या.

### दंतवैद्यांनो, सावधान

आधुनिक व्यापारव्यवहारांत पुढारलेल्या पाश्चात्य देशांतून इतर व्यवसायाप्रमाणें विम्याचीही प्रगति विविध क्षेत्रांत झालेली आहे. ज्या ज्या अनपेक्षित परंतु संभाव्य प्रसंगाची भवितव्यता विमागणितीला अजमावतां येईल त्या त्या प्रसंगाचे म्हणजे त्या प्रसंगापासून उद्भवणाऱ्या परिणामापासून बचाव करण्याचे विमे उतरण्याची प्रथा या देशांतून चांगली दृढमूल झालेली आहे. अमेरिकेंत तर कांहीं सिनेमा नटी आपल्या मधुर हास्याचाही विमा उतरतात. इतकें असून सुद्धां कांहीं कांहीं प्रसंग अगदीं अचानक घडून येतात व त्यामुळें कोणाला तरी नुकसानभरपाई देण्याची पाळी येते. साधारणपणें असा प्रघात आहे कीं अवघड शस्त्रक्रिया डॉक्टर रोग्याच्या संमतीनें करतो आणि अशा रीतीनें आपल्यावरील जोखमींतून तो आधींच मुक्त होतो. पण अवघड शस्त्रक्रिया सोडून, दांत काढण्यासारख्या कांहीं शस्त्रक्रिया किरकोळ स्वरूपाच्या असतात आणि कोणताही कुशल दंतवैद्य शस्त्रक्रिया बिघडली तर तिचा विमा उतरण्याचें मनांतही आणणार नाहीं. अशाच एका इंग्रज दंतवैद्याला १५०० पौंड नुकसानभरपाईदाखल द्यावे लागले. मि. जॉफ्रे बॉंड नांवाचा एक सिनेमा नट आपली दाढ उपटून घेण्यासाठीं म्हणून डॉ. मॉरिस व्हिटन नांवाच्या दंतवैद्याकडे गेला, प्रथम दाढ काढण्यासाठीं हिरड्या बधिर करण्यांत आल्या. परंतु दाढ लवकर न निघाल्यामुळें डॉक्टर मजकुरांना गुंगीच्या औषधाचा उपयोग करावा लागला व अखेर ती दाढ त्यांनीं उपटली. सिनेमानट मि. बॉंड घरीं आल्यावर त्याला आपला खालचा जबडा पिचला असल्याचें आढळून आलें, म्हणून त्यानें कोर्टांत नुकसानभरपाईचा दावा लावला. या दाव्याचा निकाल मि. बॉंड यांच्यासारखा लागून त्याला वर सांगितलेली नुकसानभरपाई मिळाली. फिर्यादीच्या तक्रारीला उत्तर म्हणून डॉ. व्हिटन यांच्यातर्फे असा मुद्दा पुढें मांडण्यांत आला कीं, मि. बॉंड याच्या जबड्याचीं हाडें नेहमींपेक्षां अधिक ठिसूळ असल्यानें तीं पिचलीं. मि. बॉंड यांच्या जबड्याचीं हाडें पिचण्याइतकीं ठिसूळ होतीं कीं नव्हतीं याबद्दल कोर्टाला विचार करण्याची जरूरही नव्हती; व तो प्रश्नही तज्ज्ञांच्या प्रांतांतील होता. पण कोर्टांतील खटल्याचा निकाल ऐकून दंतवैद्यांनीं अशा क्वचित् घडणाऱ्या प्रसंगाचा विमा उतरणें जरूर आहे असें म्हणतां येईल.

---

### चुंबनावर नियंत्रण !

विमानांतून प्रवास करणाऱ्या उतारूंच्या विमान तळावरील चुंबनांवर लंडन येथील पोलिस अधिकाऱ्यांनीं नियंत्रण घातलें आहे. उतारू व त्यांच्या पत्नी व कौटुंबिक मंडळी ह्यांच्या चुंबनासाठीं एक स्वतंत्र जागा राखून ठेवली आहे, आणि तेथील कार्यक्रम विमान सुटण्याच्या वेळेच्या आधीं अर्धा तास तरी अगोदर आटोपण्यांत आला पाहिजे असा नियम केला आहे. ह्या ठराविक ठिकाणीं उतारूनें आपल्या पत्नीचें ( किंवा कोणाचेंही ) चुंबन घ्यावें, परंतु त्या ठिकाणाच्या मर्यादेबाहेर येतां क्षणींच तो कस्टम्स खात्याच्या अधिकारक्षेत्रांत येतो. ज्यांचें सामान अगोदर तपासण्यांत आलें आहे, अशांना चलन किंवा जकात पडणारे जिन्नस हातचलाखीनें देण्यास चुंबनाच्या कार्यक्रमानें सवड मिळूं शकते ती मिळूं नये, हा चुंबनाच्या नियंत्रणाचा उद्देश आहे.


दि विजय टेक्स्टाइल्स लिमिटेड

—येरंडवणा, पुणें ४—

अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल रु. १,००,०००

खपलेलें भांडवल रु. ५३,०००

सदर भांडवल २५ रुपयांच्या २००० ऑर्डिनरी शेअर्समध्यें आणि ५० रुपयांच्या ६ टक्के दराच्या १००० प्रेफरन्स शेअर्समध्यें विभागण्यांत आलें आहे.

—मॅनेजिंग एजंटस—

महा—कवडीकर आणि कंपनी

सदर कारखान्यांत नित्योपयोगी सुती कापड तयार होतें




मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

आंध्र खादीचे ( म्हणजेच ४० नंबराच्या वरच्या नंबराच्या सुताच्या खादीचे )
—एकमेव विक्रेते—

खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

तयार कपड्यांचे व्यापारी महिंद्रकर ब्रदर्स गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३, शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.